# Washim District Police

**Nature of Work** :- Recovery of Stolen Property

**Police Station** :- Cyber Cell

**Date of Good Work done** :- 17/12/2022

**Brief of the work done :-**

वर्षभरात CEIR पोर्टलद्वारे शोधले 165 मोबाईल ; सायबर सेल वाशीम यांची उत्कृष्ट कामगिरी.

## वाशिम पोलीसांनी CEIR पोर्टलव्दारे २०२२ मध्ये शोधले १६५ मोबाईल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ सध्याच्या इंटरनेट युगामध्ये दैनंदीन जीवनातील सर्व व्यवहार मोबाईलवरुन होत असतात. ॲन्ड्रॉईड मोबाईल फोन हा आज प्रत्येक नागरीकाकडे असुन, मोबाईल फोन हा त्याच्या दैनंदिन जीवनाचा अत्यावश्यक घटक बनलेला आहे. मोबाईलमधुन इंटरनेटव्दारे नागरिकांना घरबसल्या सर्व सोयीसुविधा घरपोच होत आहेत. नागरिकांना त्यांचे आप्तेष्ट मंडळी, मित्रमैत्रिणी हे जगामध्ये कितीही सर्वदुर असले, तरी मोबाईलवर व्हॉईस कॉल व व्हिडीओ कॉलव्दारे संपुर्ण जग जवळ आलेले आहे.



अशा मोबाईलच्या युगामध्ये मोबाईल हरवल्यास मोबाईल धारकास त्याचा दैनंदिन व्यवहार बंद पडल्याची जाणीव होते. परंतु मोबाईल हरवल्यास घाबरुन न जाता, मोबाईल हरवल्याबाबतची तक्रार नागरिक जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये करतात. केंद्र शासनाच्या दुरसंचार मंत्रालय विभागाच्यावतीने Centraled Equipment IntityedRegister(CEIR) ही वेबपोर्टल सुविधा चालु करण्यात आलेली आहे. सदर वेबपोर्टलवर कोणीही व्यक्ती मोबाईल हरवल्याची तक्रार इंटरनेटव्दारे दाखल करु शकते. वेबपोर्टलवर तक्रार नोंद झाल्यानंतर हरवलेल्या मोबाईलच्या IMEI मध्ये कोणत्याही कंपनीचे सिमकार्ड ॲक्टीव झाल्यावर मोबाईल तात्काळ ट्रेस करण्यात येतो. वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी सर्व पोलीस स्टेशन्स व सायबर सेलला येणाऱ्या तक्रारकर्त्यास मोबाईल हरवल्याबाबतची तात्काळ तक्रार नोंद करण्याबाबत व CEIR वेबपोर्टलवर तक्रार नोंद करण्यास मदत करण्याचे आदेशित केलेले आहे. सन २०२२ मध्ये वाशिम जिल्ह्यात ५०२ मोबाईल हरवल्याचे तक्रारी प्राप्त असुन, सर्व तक्रारी CEIR वेबपोर्टलवर नोंद करण्यात आलेल्या असुन, त्यापैकी १६५ मोबाईल फोन्स हे वाशिम पोलीसांनी ऴ्ंि पोर्टलव्दारे ट्रेस केलेले आहेत. ११५ मोबाईल हे मोबाईलधारकांना परत देण्यात आलेले आहेत व उर्वरित मोबाईल देखील जप्त करुन ताब्यात देण्यात येत आहेत. तरी वाशिम पोलीस दलामार्फत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपला मोबाईल फोन हरवल्यास त्याची जवळच्या पोलीस स्टेशनला तक्रार नोंद करुन, आपल्या हरविलेल्या मोबाईलचा लवकर शोध घेण्यासाठी केंद्र शासनाच्या www.ceir.gov.in या वेबपोर्टलवर तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदवताना पोलीस स्टेशन तक्रारीची प्रत, मोबाईल बिल पावती सादर करावी तसेच आपला मोबाईल दुहेरी सिमकार्डचा असल्यास, मोबाईलचे दोन्ही आय.एम.ई.आय. नोंद करणे आवश्यक आहे. CEIR वेबपोर्टलवर तक्रार नोंद करण्यास काहीही अडचण उदभवल्यास आपण वाशिम जिल्हा सायबर सेल येथे समक्ष किंवा सपोनि संदीप नरसाळे यांना यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. (जि.प्र.)